पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे

अंक २ रा

६ मे १९९४

# अकोला - ८ मे १९९४

**- शरद जोशी**

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक ८ मे रोजी अकोला येथे भरत आहे. औरंगाबाद अधिवेशनानंतर 'करेंगे या मरेंगे' कार्यक्रम राबवण्यात अकोला जिल्हा सर्वांत आघाडीवर राहिला. त्या जिल्ह्यातील संघटनेच्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्यासाठी कार्यकारिणीची बैठक अकोल्यात घेण्याचे ठरले.

देशभर निवडणुकींचे वारे वाहू लागले आहे. सात-आठ महिन्यात पाच-सहा राज्यांतील विधानसभांच्या पोट निवडणुका होतील. त्यानंतर चार-सहा महिन्यांत ज्या राज्यांच्या निवडणुका होतील त्यात महाराष्ट्राचाही समावेश आहे.

**बैठकीची विषयपत्रिका**

औरंगाबाद अधिवेशनानंतर काय काय घडले, काळाचा प्रवाह कोणीकडे चालला आहे, बळीराज्याची उद्याची अवस्था काय आहे, येत्या वर्षभरात शेतकऱ्यांनी कोणत्या गोष्टींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे याचा विचार प्रामुख्याने या कार्यकारिणीच्या बैठकीत होणार आहे.

**औरंगाबाद ठरावा आढावा**

औरंगाबाद अधिवेशनात नव्या आर्थिक धोरणांचे स्वागत करण्यात आले, या धोरणांना विरोध करणाऱ्या ताकदी कोणत्या याचा विस्तृत आढावा घेण्यात आला. त्याबरोबरच, अंदाजपत्रकी आणि वित्तीय तूट ही समस्या गंभीर आहे, केंद्र शासन त्यावर योग्य तोडगा काढू शकणार नाही, सरकारी उधळपट्टी थांबवू शकणार नाही, करात एकतर भरमसाठ वाढ करेल आणि उद्योजकांच्या पायातल्या बेड्या आणखी अवजड करेल किंवा निवडणुका जवळ येत असल्याने करांबद्दलही उदार धोरण स्वीकारेल आणि तूट वाढू देईल, महागाई भडकू देईल अशी भीतीही औरंगाबाद अधिवेशनाच्या ठरावांत व्यक्त करण्यात आली होती.

आंतरराष्ट्रीय देवीघेवीसंबंधीच्या डंकेल प्रस्तावावर तर एक पुरी संध्याकाळ मोठी अभ्यासू चर्चा झाली. आर्थिक सुधार, अंदाजपत्रकी तूट आणि डंकेल प्रस्ताव हे औरंगाबाद अधिवेशनातले तीन महत्त्वाचे विषय या तीन प्रश्नांवरील तोडगा म्हणून अधिवेशनाने जे निर्णय घेतले त्यांची एक दिशा स्पष्ट आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या स्वातंत्र्याचे म्हणजे बळीराज्य आणण्याचे आंदोलन अधिक प्रभावीही केले पाहिजे आणि त्याबरोबरच अधिक व्यापकही केले पाहिजे. आंदोलन तीव्र व्हावे यासाठी १९४२ सालच्या 'चले जाव आंदोलना'च्या धर्तीवर शेतकऱ्यांनी नवे आंदोलन उभारावे, उत्पादन, आयात, निर्यात, व्यापार, सरकारी कर, कर्जवसुली यासंबंधीचे सारे सारे निर्बंध झुगारून द्यावेत; त्यासाठी मरण पत्करावे लागले तरी चालेल. गावागावांत दारूदुकानबंदी करावी, लक्ष्मीमुक्ती करावी, अशा मुक्त गावांना 'बळीराज्याचे गाव' मानावे. सरकारी वसुलीपासून अशा गावांचे संरक्षण 'नाना पाटील ब्रिगेड'ने करावे असा मोठा प्रखर आंदोलनाचा कार्यक्रम ठरला.

**८ मे १९९४ रोजी अकोला येथे होणाऱ्या शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणीच्या संयुक्त बैठकीच्या निमित्ताने शरद जोशी यांचे प्रास्ताविक**

**भीक नको....**

शेतीमालाचा भाव हे शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे उद्दिष्ट रास्त भाव सरकारकडून भीक मागून मिळवणे नाही. शेतीमालाच्या बाजारपेठेत सरकारी हस्तक्षेप संपला, खुली व्यवस्था आली म्हणजेच शेतकऱ्याला सन्मानाने आणि सुखाने जगता येईल ही संघटनेची सनातन भूमिका आहे. शेतीमालाच्या भावाचा लढा आता खुल्या व्यवस्थेचा लढा झाला आहे. लढाईची रणभूमी अधिक लांब झाली आहे. हा लढा आता एकट्या शेतकऱ्याने लढावयाचा राहिला नसून ज्याला ज्याला म्हणून स्वातंत्र्यात जगण्याची इच्छा आहे, सरकारशाहीला ज्याचा ज्याचा विरोध आहे त्या सगळ्यांना एकत्र करून ही लढाई लढवावी लागेल.

**व्यापक रणभूमी**

रास्त भावाच्या लढाईत फक्त शेतकऱ्यांची फौज होती. स्वातंत्र्याच्या लढाईत सर्व उद्योजकांचा मोर्चा बांधावा लागेल. सरकारी सूट सबसिडींचा आधार न घेता आपापला व्यवसाय चालवण्याची हिंमत असलेला प्रत्येक उद्योजक नव्या लढाईत सामील झाला पाहिजे.

नवीन लढाई केवळ खेड्यापाड्यातूनच नाही, शहरांतून आणि महानगरांतूनही लढवावी लागेल. केवळ आर्थिक बाबींवरच नव्हे, तर शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय आघाडीवरही संघर्ष करावा लागेल, याही गोष्टीचा विचार औरंगाबाद येथे झाला. इतर उद्योजकांशी दोस्ती करून आवश्यक तर नवे राजकीय धोरण आखावे यासाठी एक राजकीय समितीही नियुक्त करण्यात आली.

औरंगाबाद अधिवेशनानंतरच्या सहा महिन्यांत काय काय घडले?

**व्यसनी काँग्रेस**

आर्थिक सुधारणांच्या बाबतीत आता मनांत कोणताही संदेह बाळगण्याचे कारण नाही. घुमजाव करून उलट्या दिशेने परत जाण्याची आणि निदान शेतीच्या बाबतीत तरी 'नेहरूव्यवस्था' पुन्हा प्रस्थापित करण्याची तयारी सुरू झाली आहे.

पहिल्यापासून खुलीकरणाच्या धोरणावर काँग्रेस सरकारचा दृढ विश्वास किंवा निष्ठा नव्हती. विदेशी चलनाच्या तुटीच्या संकटात सापडल्याने नाईलाज म्हणूनच खुलीकरणाची भाषा सुरू झाली. नेहरू-इंदिरा गांधी यांनी राबवलेल्या धोरणांपासून आपण दूर का जात आहोत त्याची कारणमीमांसा लोकांना पटवणे सोपे काम नव्हते. स्टॅलिन, लेनिन यांचे पुतळे खाली खेचले गेले, त्याप्रमाणे जवाहरलाल, इंदिरा यांचे पुतळे खेचले गेले तर पुढच्या निवडणुकीत काँग्रेसपक्षाची धूळधाण होईल. नरसिंहराव आणि आर्थिक सुधारणा यांच्या नावावर पक्षाला मते मिळणे कठीण आहे हे काँग्रेसवाल्यांना पहिल्यापासून कळत होतेच; आता अगदी स्पष्ट झाले आहे. अवमूल्यन, महागाईच्या वाढत्या गतीवर काबू, आणि खुलीकरण यामुळे विदेशी चलनाचा साठा भरभक्कम झाल्यानंतर पुन्हा एकदा नेहरूव्यवस्थेच्या व्यसनाकडे जाण्याची शक्यता तयार झाली. अशा परिस्थितीत नेहरूपरंपरेशी चिकटून राहणेच आपल्या मतपेटीच्या हिताचे आहे असा आडाखा पंतप्रधानांनी बांधला आहे. पंतप्रधानांचे डाओसचे भाषण, मध्यममार्गाची त्यांनी केलेली भलावणी, १९९३-९४ सालचे अजागळ अंदाजपत्रक यांवरून सरकार आता खुलीकरणाच्या आघाडीवरून मागे पळण्याच्या तयारीत आहे, हे स्पष्ट झाले.

**बिनबुडाचे विरोधक**

'गॅट करारा'वर सही करण्यावाचून सरकारला गत्यंतरच नव्हते, सही करावीच लागली. पण या करारांच्या प्रश्नावर विरोधकांनी अगदी बिनबुडाची प्रचाराची धुमाळी माजवली. डाव्या साम्यवाद्यांपासून राष्ट्रीय स्वयंसेवकसंघापर्यंत सगळे एकदम 'स्वदेशीवादी' झाले, सरकारशाहीवादी झाले ही मोठी विनोदी घटना आहे, पण तितकीच भयानकही आहे.

१५ डिसेंबर रोजी डंकेल प्रस्तावावर सह्या झाल्या आणि अलिकडे मराकेश येथे गॅट करारावर सह्या झाल्या. मध्यंतरीच्या काळात अमेरिकेसारख्या देशांच्या लक्षांत आले की डंकेल प्रस्तावाच्या चर्चेत अमेरिका, जपान आणि युरोप यांची साठमारी झाली, पण हिंदुस्थानसारख्या देशांच्या निर्यातीसाठी नकळत विकसित राष्ट्रांचे दरवाजे खुले झाले. गडबडघाई करून मराकेश बैठकीच्या आधी झोपा करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हिंदुस्थानसारख्या देशात मजुरांचे शोषण होते, बालकामगारांचे शोषण होते, मानवी हक्कांचा भंग होतो, पर्यावरण शाबूत ठेवण्याची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे तेथील वस्तूंचा उत्पादनखर्च कमी होतो. यावर तोडगा म्हणून हिंदुस्थानसारख्या देशांच्या मालावर खास आयातकर बसवण्याची तरतूद असावी असा प्रयत्न करण्यात आला. आज लगेच त्याला यश मिळालेले नाही. पण कामगार, पर्यावरण यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अमेरिका पुढे येते आणि हिंदुस्थान सरकार त्याला विरोध करते, एवढेच नव्हे तर जॉर्ज फर्नांडिसपासून मेधा पाटकरांपर्यंत सगळे भारत सरकारच्या बाजूला उभे राहतात असे मोठे गमतीशीर दृश्य दिसून आले.

**बलहीन बळीराजा?**

गॅट करारावर सही करणे भाग पडले म्हणून काही आम्ही उघड्या डोळ्यांनी शेतकरी स्वतंत्र झालेला पाहणार नाही, शेतकऱ्यांवरील सर्व बंधने चालू ठेवू अशा निर्धाराने सरकार कामाला लागले आहे. दूध, मद्यार्क, उसाची मळी, कापूस इ. वस्तूंच्या बाबतीत गेल्या दोन वर्षात उठवण्यात आलेली बंधने पुन्हा एकदा परत बसवण्यात येत आहेत. कापसाच्या निर्यातीवर बंधने घालण्यात आली, एवढेच नव्हे तर आता जवळजवळ सरसकट शेती मालाच्या निर्यातीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

शेती, शेतीउद्योग आणि व्यापार यावरील बंधने आहेत तशी कायमच आहेत.

थोडक्यात, आज वामनाची सरशी होते आहे आणि बळीराजा पुन्हा एकदा पाहिजे तर माझ्या मस्तकावर पाय ठेवा अशी विनवणी करत वामनापुढे बसला आहे.

**खोकडलांडगे आणि वाघ**

खुलीकरणाच्या धोरणापासून सरकार जी पिछेहाट करीत आहे त्यात सरकारला दोष देणे कठीण आहे. शेतकरी समाज सोडला तर नेहरूव्यवस्थेने सर्व लाचारांचे राज्य उभे केले होते.

कारखानदार, नोकरदार, पुढारी सरकारशाहीतील संरक्षण, सबसिडीच्या राजवटीस चटावलेले. खुल्या अर्थव्यवस्थेत स्वतःच्या पायावर उभे राहून स्पर्धा करण्याची मुळी त्यांची ताकदही नाही आणि प्रकृतीही नाही. त्यांनी खुलीकरणाला विरोध करावा यांत आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

औरंगाबाद अधिवेशनात पिंजऱ्यातील वाघाचा वारंवार उल्लेख झाला. आसपासच्या पिंजऱ्यातील खोकड, लांडगे यांना स्वातंत्र्याची चव नसावी हे समजण्यासारखे आहे. पिंजऱ्यातील वाघ दरवाजा मोडून पडला असतानाही स्वस्थ जांभया देत बसला आहे. एका झेपेमध्ये पिंजऱ्याच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत नाही. खरे आश्चर्य आणि दुःख वाघाबद्दल आहे, खोकडालांडग्याबद्दल नाही.

शेतकरी उद्योजक आहे. आजपर्यंत सरकारने शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय केला, कारखानदारांचे लाड प्यार केले आणि तरीही शेतकरी जागतिक स्पर्धेत टिकू शकेल ही गोष्ट आता सिद्ध झाली आहे. डंकेल प्रस्तावसंबंधी सरकारी दस्ताऐवजावरून भारतीय शेतकऱ्याची 'उलटी पट्टी' थोडी थोडकी नाही, पुरी ६९% आहे हे सिद्ध झाले. 'शेतकऱ्याचे मरण हे सरकारी धोरण ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली. आपल्या खापर पणजोबा, पणजोबापासून सारे पूर्वज कर्जात जगले, कर्जात मेले. कुटुंबातल्या माणसांना धड पोटभर मिळाले नाही, अंगभर वस्त्र नाही, शेतकऱ्याची दैना दैना झाली. कारण सरकारने जाणीवपूर्वक उणे सबसिडी शेतकऱ्यांवर लादली. हे ठाऊक नव्हते तोपर्यंत ठीक होते. आज हे स्पष्ट झाल्यानंतरही शेतकरी चिडत नाही, संतापत नाही; सरकार शेतकऱ्यांचे भले करते, त्यांना किती किती सबसिड्या देते, त्यांच्याकडून करदेखील घेत नाही अशी भाषणे करणाऱ्या पुढाऱ्यांच्या तोंडाला काळे फासून त्यांची गाढवावरून धिंड काढत नाहीत. शेतकऱ्यांच्या अंगी गुलामगिरी इतकी बाणली आहे!

**नावांच्या गजरात पर्याय हरवला –**

रामाचे नाव घेणारे मशिदी पाडतात, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या जिवावर उठतात, पत्रकारांना झोडपून काढतात त्यांना बोट लावण्याची सरकारची हिंमत होत नाही. तेच सरकार कापसाचा बरा भाव मिळावा म्हणून शेजारच्या राज्यात जाणाऱ्या गाड्या अडवते, याचाही शेतकऱ्यांना काही राग नाही, चीड नाही. काँग्रेसवाले नेहरूंचे नाव वापरतात. हिंदुत्ववादी रामाचे नाव घेतात. संख्येचे राजकारण करणारे आता आंबेडकरांचे नाव घेऊन सत्तेकडे चालू लागले आहेत. काशीराम आणि दलित चळवळीचे इतर म्होरके काय पात्रतेची माणसे आहे हे माहित असूनही दलित जनता 'कसा कां असेना, आहे ना? अशा विचाराने त्यांच्या मागे जात आहे. निवडणुका जवळ येताहेत. मतदान केंद्रावर गेल्यानंतर मतदारापुढे पर्याय एवढाच राहणार आहे. मत दाऊद इब्राहमला द्यायचे का अरुण गवळीला, तिसरा पर्याय आज काही उभा नाही.

देशात उद्योजक एकच, तो म्हणजे शेतकरी. पण त्यातीलही निम्मे अधिक आपली उद्योजकता विसरून सरकारशाहीवाद्यांच्या बरोबरीने डंकेल मुर्दाबादच्या घोषणा देत आहेत. काही विशेष घडले नाही तर बळीराजाला वामन पुन्हा एकदा जमिनीत गाडणार अशी लक्षणे दिसत आहेत.

# बळीराज्याच्या रक्षणासाठी किसान समन्वय समिती सज्ज

## बलसाड येथील बैठकीतील निर्णय

भारतातील शेतकऱ्यांच्या विविध राज्यांतील संघटनांच्या किसान समन्वय समितीची बैठक ३० एप्रिल व १ मे १९९४ रोजी गुजरातेतील बलसाड येथे पार पडली.

पंजाब, हरयाना, बुंदेलखंड (उ.प्र.), मध्य प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक इत्यादी रात्यांतील विविध संघटनांचे प्रतिनिधी या बैठकीस हजर होते. 'गुजरात खेडूत समाज'चे अध्यक्ष श्री. बिपीनभाई देसाई समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर होणारी समितीची ही पहिलीच बैठक होती.

बैठकीमध्ये पुढील ठराव मंजूर करण्यात आले.

**१) आर्थिक सुधार कार्यक्रम :**

किसान समन्वय समितीने देशातील शेतकरी आंदोलनाचा, विशेषकरून, आर्थिक सुधार व गॅट कराराच्या अनुषंगाने सखोल आढावा घेतला.

सुरुवातीला थोडी फार आशा निर्माण करणाऱ्या आर्थिक सुधारांच्या कार्यवाहीमध्ये ढिलाई व हेळसांड होत आहे, या कार्यक्रमांचा जोम ओसरत आहे, किंबहुना त्या बाबतीत माघारीची पावले टाकली जात आहेत याची समितीने नोंद घेतली.

महागाईवाढीच्या दरावरील काबू सुटला आहे, सरकारच्या स्वतःचा प्रशासकीय खर्च कमी करण्यातील असमर्थतेमुळे अंदाजपत्रकी व वित्तीय तूट वाढली आहे, याही उपर शासनाने आणखी एक वेतन-आयोग स्थापन केला आहे या बाबींची समितीने गंभीर दखल घेतली.

विशेषतः, शेतीक्षेत्राला आर्थिक सुधार कार्यक्रमांतून पूर्णपणे वगळण्यात आले आहे याची समितीने गंभीर दखल घेतली. परवाना मुक्ती, शेतीमालाच्या देशांतर्गत व परदेशी

**पान ४ वर**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th May, 1994

**To**

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
May 6, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
**No. 87**

**पान ३ वरून**

वाहतुकीवरील निर्बंध रद्द करणे या बाबी आर्थिक सुधारांच्या कक्षेत येऊच दिल्या नाहीत. उलट, दूध, मळी, मद्यार्क, कापूस वगैरे शेतीमालांवरील निर्बंध पुन्हा लादण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सरकारने गॅट करारावर सही केली हे खरे असले तरी सरकार त्यातील शेतीमालासंबंधी तरतुदींचा भंग करीत आहे. उदा. निर्यातीतील निर्बंध नुसते चालू ठेवणेच नाही तर अधिक कडक करणे, बाजारभावापेक्षा कमी भावात शेतीमालाची वसुलीखरेदी करणे, शेतीक्षेत्राला दिल्या जाणाऱ्या समग्र अनुदानांचा – अधिक व उणे – विचार करण्याऐवजी अधिक (+) अनुदाने निवडून काढून रद्द करणे (उदा. वीज) या घटनांचीही समितीने नोंद घेतली.

सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने गॅटपुढे दिलेल्या कबुलीजबाबाने, भारतातील शेतकऱ्यांना दिली जाणारी सबसिडी संपूर्ण जगात कमीत कमी म्हणजे उणे ६९ टक्के आहे हे निःसंशयपणे सिद्ध झाले आहे याची समितीने नोंद घेतली.

किसान समन्वय समितीची स्पष्ट धारणा आहे की आर्थिक सुधार कार्यक्रमांच्या पिछेहाटीमागे, मुख्यतः पुढील कारणे आहेत :

१) सरकारी निष्ठेचा अभाव;

२) सुरक्षित व्यक्ति-समूह, संघटित कामगार, राजकीय दलाल वगैरे नेहरूव्यवस्थेच्या लाभधारकांचा विरोध; आणि

३) स्वातंत्र्यावर श्रद्धा असणाऱ्या आणि जलद व परिणामकारक रीतीने अर्थव्यवस्थेचे निःशासनीकरण होण्याची मनीषा बाळगणाऱ्या बहुसंख्य जनतेचे संघटित व सुनियंत्रित न होणे.

**२) खुल्या बाजाराच्या पुरस्कर्त्यांची आघाडी**

किसान समन्वय समितीने आपल्या चंडीगढ बैठकीत (फेब्रु. १९९३) घेतलेल्या निर्णयाप्रमाणे खुल्या अर्थव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांची विस्तृत पायावर देशव्यापी आघाडी तयार करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. येत्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी या देशातील नागरिकांसमोर खुली अर्थव्यवस्था; किमान आणि कार्यक्षम शासन आणि क्षुद्रवादी दडपणांतून मुक्त असा बहुकेंद्री समाज यांसाठी मतदान करण्याचा पर्याय उभा राहील अशी आशा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**३) आर्थिक सुधार कार्यक्रमांवर देखरेख**

– उणे ६९ टक्के अनुदान याचा अन्वयार्थ शेतकरी आणि इतरही सर्व जनतेला समजावून देणे; आणि

– आर्थिक सुधार कार्यक्रम व गॅट करार यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे

यासाठी सर्व संघटनांनी विशेष प्रयत्न करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**४) कर्जमुक्ती आंदोलन :**

जनता दल शासनाने १०,००० रुपयांपर्यंतची कर्जे माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर किसान समन्वय समितीचे कर्जमुक्ती आंदोलन (१९८८-९०) मागे घेण्यात आले होते. २० वेगवेगळ्या शेतीमालांवर दर साल २४,००० कोटी रुपये उणे सबसिडी दिली जाते या सरकारी कबुलीजबाबाने ग्रामीण कर्जबाजारीपणाचा विषय पुन्हा पुढे आला आहे असे किसान समितीचे मत आहे.

सरकारच्या कबुलीजबाबाने आता सिद्ध झाले आहे की शेतीक्षेत्रातील कर्जबाजारीपणा हा सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचाच परिणाम आहे.

शेतकऱ्यांवरील तथाकथित कर्जे काल्पनिकच नव्हेत तर बेकायदेशीर व अनैतिक आहेत. सर्व शेतकऱ्यांची एकूण थकित कर्जे सुमारे १४,००० कोटी रुपयांची आहेत आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांवर लादलेला कर ६९ टक्के इतका प्रचंड आहे. शेतकरी सरकारचे काहीच देणे लागत नाहीत, सरकारकडूनच शतकऱ्यांचे अब्जावधीचे येणे आहे.

किसान समन्वय समिती ठराव करते की, १ जुलै १९९४ पासून कर्जमुक्ती आंदोलन पुन्हा सुरू करण्यात येईल. शेतकरी सर्व वसुली अधिकाऱ्यांना, शेतकरी ज्यांचे काहीही देणे लागत नाहीत, उलट घेणे लागतात अशा दरोडेखोरलुटारूंचे दलाल मानतील. आणि म्हणून त्यांना गावात प्रवेश करण्यास मनाई करून त्यांच्या चेहेऱ्यांना काळे फासून त्यांना हाकलवून लावतील.

आर्थिक सुधारांचा कार्यक्रम व गॅट करार यांच्या अंमलबजावणीमध्ये ठोक सुधारणा होण्याची लक्षणे दिसेपर्यंत हे आंदोलन मागे घेण्यात येणार नाही.

**बिपीन देसाई,**
अध्यक्ष,
किसान समन्वय समिती

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.